जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

**प्रेसनोट क्रमांक - १३८०** **दिनांक २८/११/२०२०**

## चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन पुणे शहर

## शंभर पेक्षा जास्त घरफोडी करणारा अट्टल गुन्हेगारास चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनच्या पोलीसांकडुन अटक करून एकूण ७,२०,०००/-कि.रू चा मुद्देमाल हस्तगत करून ०३ गुन्हे उघडकीस आणले आहेत.

चतु:श्रृंगी पोलीस स्टेशनचे हददीमध्ये पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे व तपासपथकातील स्टाफ असे घर फोडी गुन्हयाबाबत माहिती काढत असताना पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की,रेकॉर्डवरील घरफोडी करणारा गुन्हेगार नामे जयवंत ऊर्फ जयडया गोवर्धन गायकवाड वय ३२ वर्षे डी.पी.रोड, आंबेडकर वसाहत,औंध पुणे याने फेब्रुवारी २०२० मध्ये शासकीय तंत्रनिकेतन कर्मचारी वसाहत गणेशखिंड रोड पुणे येथे घरफोडी चोरी केली आहे अशी खात्रीशीर माहिती मिळाल्याने सदर महिती श्री नामदेव चव्हाण सो,अपर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग पुणे,श्री पंकज देशमुख सो,पोलीस उप आयुक्त परिमंडळ ४ पुणे शहर,मा.सहा.पोलीस आयुक्त,श्री रमेश गलांडे यांना देवून त्यांनी केलेल्या सुचना प्रमाणे अनिल शेवाळे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,यांचे मार्गदर्शनाखाली,पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे,अमंलदार सारस साळवी,ज्ञानेश्वर मुळे,संतोष जाधव,तेजस चोपडे यांची टिम तयार करून त्यांनी सदर आरोपीस मा.न्यायालयाचे परवानगीने येरवडा कारागृहातून ताब्यात घेवून सदर आरोपीस चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन गुन्हा रजि.नं.९४०/२०२० भादवि कलम ४५४,४५७, ३८० या गुन्हयात गुन्हयात अटक करून आरोपीकडून खालील प्रमाणे गुन्हे उघउकीस आलेले आहेत.

१) चतु:श्रृंगी पो.स्टे.गुन्हा रजि.नं.९४०/२०२० भादवि कलम ४५४,४५७,३८०

२) चतु:श्रृंगी पो.स्टे.गुन्हा रजि.नं. १४/२०२० भादवि कलम ४५४,४५७,३८०

३) चतु:श्रृंगी पो.स्टे.गुन्हा रजि.नं.१४६/२०२० भादवि कलम ४५४,४५७,३८०

वरील प्रमाणे गुन्हे उघडकीस आले असून आरोपीकडून १५३ ग्रॅम सोन्याचे दागिने, असा एकुण ७,२०,०००/-कि.रूपयाचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.दाखल गुन्हयाचा अधिक तपास पोलीस उप निरीक्षक प्रेम वाघमोरे हे करीत आहेत.